| इतर किरकोळ फौ. अर्ज क्र.२२५/२०२५ मधील निशाणी क्र.१ खालील आदेश. (बाळासाहेब यशवंत आरोटे वि. महाराष्ट्र सरकार) | MHAH150019192025 |
|---|---|

अर्जदार याने सदरचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३(१) अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, त्याचे ताब्यातील व नावावर असलेला टाटा कंपनीचा ढंपर १६१३ त्याचा आर.टी.ओ. पासिंग नंबर MH-17-T-9375 चेसीज नंबर 373135**HSZ**734440 व इंजिन नंबर 697**TC**56**HSZ**137616 हा शनिशिंगणापुर पोलिस स्टेशन यांनी गुन्हा क्र.। १७५/२०२५ चे तपासाकामी जप्त केलेली आहे. सदर वाहन जप्त असल्यामुळे अर्जदारास त्याचे दैनंदिन कामाकरिता अडचण निर्माण होत आहे. सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात न मिळाल्यास त्याचे फार मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. सदर वाहन हे पोलिस स्टेशनला पडून राहिल्यास त्याचे ऑईल बॅटरी, टायर, ट्युब खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्याने सदर वाहन हे सुपुर्दनाम्यावर देण्यास विनंती केली.

३. तपासी अधिकारी यांनी नि. ६ वर म्हणणे दिले की, सदर जप्त ढंपर हा योग्य त्या अटी व शर्तीवर अर्जदार यांचे ताब्यात देणेस त्यांची हरकत नाही.

४. विद्वान सहायक सरकारी वकील यांनी नि. ७ वर म्हणणे दिले की, सदर वाहन हे भा. न्या.सं. ३०३(२), ३(५) या गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला आहे. अर्जदार हा गाडीचा मुळ मालक नाही. सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास त्याच्या मुळ स्वरूपात बदल होण्याची दाट शक्यता आहे. तसेच सदर वाहनाच्या इन्शुरन्सची कॉपी अर्जदार यांनी नमुद

अर्जात दाखल केलेली नाही. त्यामुळे सदर वाहन सरकार जमा होण्यास पात्र असल्याने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

५. सरकारतर्फे विद्वान सहायक सरकारी वकील व अर्जदारातर्फे त्याचे विद्वान वकील श्री. ए.आर.थीटे यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले. अर्जदाराने त्याचे अर्जातील कथनाचे पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र व निशाणी ३ सोबत आर.सी. बुकची व्हेरीफाईड प्रत, दि. ०४/०८/२०२५ रोजीचे जनरल मुखत्यारपत्राची मुळ प्रत, अर्जदाराचे आधारकार्डाची व्हेरीफाईड प्रत, एफ.आय.आरची ऑनलाईन प्रत, एम.एच.१७.टी.९३७५ या गाडीची आर.सी.बुक ची व्हेरीफाईड प्रत इ. प्रति अभिलेखावर सादर केलेली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या वाहन नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रतीवरुन सदर प्रकरणातील मुद्देमालातील वाहन हे प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे बाळासाहेब यशवंत आरोटे यांच्या नावाने नोंदणीकृत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे अर्जदार हा सदर वाहनाचा मालक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

६. चौकशी अधिका–याच्या अहवालावरुन सदर वाहन हे शनिशिंगणापुर पोलिस स्टेशन येथे गुन्हा क्र.I–१७५/२०२५ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५, ३, खाण आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७ कलम २१, ४ व बी.एन.एस, २०२३ चे कलम ३०३(२), ३(५) प्रमाणे जप्त असल्याचे दिसून येते. तसेच सदर वाहनावर अदयापपावेतो कोणीही हक्क सांगितलेला नाही अथवा त्याबाबत दावा केला नाही. तपास अधिकारी यांचे खुलासावरुन सदर वाहन तपासाकामी आवश्यक असल्याचे दिसून येत नाही. उपरोक्त वाहन हे पोलिस स्टेशनमध्ये उघडयावर ठेवलेले असल्यामुळे त्याचे

नुकसान होण्याची व जर अर्जदाराला सदर वाहन सुपुर्दनाम्यावर न दिल्यास त्याची अपरिमीत हानी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे मी या मतापर्यंत आले आहे की, काही अटी व शर्तीच्या अधीन राहून अर्जदारास सदर वाहन सुपुर्दनाम्यावर परत देण्याचा आदेश पारित करणे न्यायोचित राहील. वरील कारणांकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्जदाराचा अर्ज खालील अटी व शर्तीसह मंजुर करण्यात येतो. |
| २. | जप्त टाटा कंपनीचा ढंपर १६१३ त्याचा आर.टी.ओ. पासिंग नंबर MH-17-T-9375 चेसीज नंबर **373135HSZ**734440 व इंजिन नंबर **697TC56HSZ**137616 हा रक्कम रुपये १०,००,०००/- (रुपये दहा लाख मात्र) च्या सुपुर्दनाम्याच्या बंधपत्रावर अर्जदारास देण्यात यावी. |
| ३. | अर्जदाराने सदर मामल्याच्या अंतीम निकालापर्यंत सुपुर्दनाम्यावर दिलेल्या सदर वाहनाच्या स्वरुपात कोणत्याही प्रकारे बदल करु नये तसेच विक्री करु नये किंवा अन्य मार्गाने तिची विल्हेवाट लावू नये. |
| ४. | उपरोक्त जप्त वाहन हे न्यायालयाने किंवा चौकशी अधिका-याने आदेशीत केल्यास वेळोवेळी प्रकरणाच्या चौकशी दरम्यान, मामल्याच्या सुनावणी दरम्यान व अंतिम निकालापर्यंत न्यायालयात हजर करावे. |
| ५. | संबंधीत चौकशी अधिका-याने सदरची जप्त वाहन हे अर्जदाराला सुपुर्दनाम्यावर देण्यापूर्वी अर्जदाराच्या खर्चाने वाहनाचे चारही बाजुंनी त्यांचे रंगीत छायाचित्र काढावे व सविस्तर पंचनामा करावा तसेच वाहनाच्या छायाचित्रासहीत छायांकित प्रती अर्जदाराकडून घ्याव्या. |
| ६. | तपासी अधिकारी यांनी सदर प्रकरणातील सर्व कागदपत्रे गुन्हा क्र.I-१७५/२०२५ |

| | |
|---|---|
| | बाबत दाखल दोषारोपपत्रासोबत ठेवण्यात यावे. |
| ७. | पोलिस स्टेशन अधिकारी, शनिशिंगणापुर यांना आदेश कळविण्यात यावा. |

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2026.03.24 18:06:08 +0530

दिनांकः २४/०३/२०२६.

ठिकाणः नेवासा

**( ए. एन सरक)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्रं.३,

नेवासा.